दक्षिण कोंकणांतील बोलीभाषेंत लिहिलेलें

# गजालीन् घोव् खाल्लो !

( कुडाळी बोलींतील विनोदी प्रहसन )

★

लेखक :- प्रो. दिनानाथ गजानन नाईक
एम. अे. पी.एच् डी.
२५, कुडाळदेशकर ब्राह्मणनिवास, मुंबई ४.

★

दसरा १९६० ]

[ मूल्य २५ नये पैसे

दक्षिण कोंकणांतील बोलीभाषेंत लिहिलेलें

# गजालीन् घोव् खाल्लो !

( कुडाळी बोलींतील विनोदी प्रहसन )

★

लेखक :- प्रो. दिनानाथ गजानन नाईक
एम. अे. पी.एच् डी.
२५, कुडाळदेशकर ब्राह्मणनिवास, मुंबई ४.

★

दसरा १९६० ] [ मूल्य २५ नये पैसे

: प्रकाशक :
दत्तात्रय पांडुरंग नाईक M. A.
C/o. गौड ब्राह्मण सभा,
कुडाळदेशकर ब्राह्मण निवास, मुंबई ४.

[ ह्या प्रहसनाबाबतचे सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन आहेत. कार्यक्रम करूं इच्छिणारांनीं लेखकाकडून लेखी परवानगी घेणें आवश्यक आहे. ]

–: भूमिका :–

| | |
|---|---|
| सादेव अण्णा:– | प्रो. दि. ग. नाईक |
| बाबल्या:– | वसंत सामंत |
| बायो:– | श्रीरंग बागलकर |
| शिवा:– | मनोहर सामंत |

[पुस्तकाच्या प्रकाशनास खानोली ग्रामोत्कर्ष समाज, श्री. आर. एच. सामंत आणि श्रीमती राधाबाई तुकाराम देसाई यांचें बहुमोल आर्थिक साहाय्य झालें

––प्रकाशक]

: मुद्रक :
म. बा. जोशी बी. ए.
ज्ञानविलास, प्रेस, पुणें २.

# प्रस्तावना

'गजालीन् घोव खाल्लो' हें कुडाळी बोलींतील विनोदी प्रहसन माझे स्नेही श्री. दि. ग. नाईक यांनीं लिहिलें असून त्याचा प्रयोग गेल्या गणेशोत्सवांत कुडाळदेशकर ब्राह्मणनिवासांत मी माझ्या मित्रांच्या सहाय्यानें सादर केला. तो यशस्वी झाला.

प्रो. दिनानाथ गजानन नाईक यांचा जन्म कुडाळ • प्रांतांतील खानोली गांवीं सन १९१५ मध्यें झाला. त्यांचें प्रा. शिक्षण खानोली येथें त्यांच्या गावीं झालें. १९३० मध्यें ते पुणें येथें नूतन मराठी विद्यालयांत दाखल झाले. १९३५ मध्यें मॅट्रिक झाल्यावर १९३९ पर्यंत चार वर्षें नोकरीनिमित्त ते अनेक ठिकाणीं भटकत होते. महाराष्ट्र शुगर फॅक्टरींत १५ रु. पगारावर त्यांनीं कांटामास्तर म्हणूनहि नोकरी केली होती. १९३९ मध्यें मुंबई नगरपालिकेंत वॉर्ड इन्स्पेक्टर म्हणून नोकरी मिळाल्यावर त्यांनीं आपलें नांव विल्सन-मध्यें दाखल केलें. इंटरला त्यांना मेरिट्स् स्कॉलर्शिप मिळाली आणि १९४५ मध्यें ते बी. ए. (ऑनर्स) झाले. ४५ ते ४७ पर्यंत ते विल्सन-मध्यें फेलो होते. १९४७ मध्यें ते एम. ए. झाले आणि लगेच रुईयामध्यें इंग्लिशचे लेक्चरर म्हणून काम करूं लागले. या वेळीं त्यांनी म्युनिसिपल नोकरीचा राजीनामा दिला. त्यानंतर नदियाड येथें त्यांची प्रोफेसर म्हणून नियुक्ति झाली होती. तेथें त्यांनीं दोन वर्षे काम केलें. १९५९ मध्यें ते पी.एच्. डी. झाले. हल्लीं खालसा कॉलेजांत ते इंग्रजीचे प्राध्यापक आहेत. खानोली ग्रामोत्कर्ष समाज मुंबई ह्या संस्थेचे ते एक प्रमुख आधारस्तंभ असून त्यांच्या कळकळीच्या कार्याची त्यांच्या गांवांत विशेष ख्याति आहे. 'श्रीमद्दत्तगिरी महाराज' हें त्यांच्या रसाळ लेखणींतून उतरलेलें संतचरित्र संतवाङमयांत चिरंजीव राहील.

आज आपण ज्याला दक्षिण रत्नागिरी जिल्हा म्हणतों तो भाग आणि गोव्यांतील बारदेशपर्यंतचा प्रदेश प्राचीन काळीं कुडाळदेश किंवा

पंचमहाल कुडाळ या नांवानें ओळखला जाई. 'कुडाळ' हें ह्या प्रदेशाचें मध्यवर्ति ठिकाण, राजधानीचें शहर आणि व्यापारी केंद्र होतें. जुन्या कागदपत्रांतून कुडाळी माप आणि कुडाळी धारा हे शब्दप्रयोग आढळतात. ह्या भागांतील देवस्थान–व्यवस्थाहि वेगळी आहे. सत्याश्रय पुलकेशीचा ज्येष्ठ पुत्र चंद्रादित्य हा चालुक्यराजा ७ व्या शतकांत कुडाळ येथें राज्य करीत होता. त्यानंतर ११ व्या शतकांत प्रसिद्ध कुडाळदेशकर 'गोमप्रभु १३ व्या शतकांत राजा देम आणि सूर्यभान व चंद्रभान प्रभु देसाई यांनीं कुडुवलपत्तन-कुडाळ येथें राज्य केले. यावेळीं दाभोळ बंदर ही उत्तरेस सरहद्द होती. १७ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत पंचमहाल कुडाळचे देशमुख वालावल येथील प्रभुदेसाई हे होते. माणगांवतर्फेचा नाईक खेमसावंत यानें हा भाग आपल्या ताब्यांत घेऊन सावंतवाडी हें राजधानीचें ठिकाण केलें. दक्षिण कोंकणचा हा भाग प्राचीनकाळीं अतिशय समृद्ध होता, हें तेथील प्राचीन अवशेषांवरून सहज दिसून येतें. ह्या भागांतील बोली भाषेला '**कुडाळी बोली**' असें नांव असून हल्लीं काहींजण स्वतःच्या गांवच्या अभिमानामुळें मालवणी, सावंतवाडची किंवा वेंगुर्ल्याची बोली म्हणून संबोधतात. आज सामान्यतः देवगडच्या नदीपासून तों गोव्यांतील कोलवाळच्या नदीपर्यंत कुडाळी बोलीचा प्रदेश आहे. गोव्यांतील बोलीला '**गोंयची**' किंवा कोंकनी–कोकणी असें नांव असून ती कुडाळीहून बरीच भिन्न आहे. कुडाळी बोलीचें संशोधन अजून कोणी केलेलें नाहीं. परंतु कै. रा. ब. वासुदेवराव बांबर्डेकर, कै. गणेश मुकुंद परुळेकर, ज्ञानकोशकार केतकर, विद्यमान श्री. आ. रा. देसाई यांनीं त्यावर लेखन केलें आहे. कुडाळीबद्दल गव्हर्नमेंट रेकॉर्डमध्यें पुढील उल्लेख आहे :—" The original language used throughout the State by Hindus excepting the higher classes, is impure Marathi and was termed Kudalee from its being peculiar to the district of that name and to the southern talooka of the Ratnagiri Collectorate " [ Bom. Govt. Records, No. X ] महाराष्ट्रराज्य अस्तित्वांत आल्यामुळें मराठी भाषेला आतां विशेष दर्जा

मिळालेला असून मध्यवर्ति मराठी भाषेच्या विकासास ज्या प्रधान बोली–भाषांनीं हातभार लावला त्या बोलींना विसरून चालणार नाहीं. मराठीच्या जन्मापूर्वी कुडाळी बोली अस्तित्वांत होती आणि कोंकण–पट्टींत ती मान्यता पावलेली होती. ह्या बोलीचें संशोधन करण्यासाठीं महाराष्ट्र सरकारचें सहाय्य मिळेल असा विश्वास वाटतो.

प्रस्तुत प्रहसन हें दसऱ्यानिमित्त टाकलेलें पहिलें पाऊल ठरो! प्रहसनाची सुरुवात व शेवट गांवांतील एक पांढरपेशे गृहस्थ सादेव–अण्णा यांच्या घराच्या ओसरीवर होते. हल्लीं कोंकणच्या खेंड्यांतून आळस आणि गप्पा यांचें साम्राज्य फार. उद्योगाची प्रवृत्ति कमी. एखाद्या कामासाठीं जाणारीं माणसें मध्येंच गप्पागोष्टींत रंगल्यावर कोणते विनोदी प्रसंग घडतात त्याचें दर्शन प्रो. नाईक यांनीं 'गजालीन् घोव खाल्लो' ह्या प्रहसनांत उत्तम रीतीनें घडविलें आहे. सर्प चावल्यामुळें आरडाओरड करणाऱ्या नवऱ्याची हाक गजालींत (गप्पांत) रंगलेल्या बायकोच्या कानीं पडली नाहीं. उपचारांच्या अभावीं तिचा नवरा स्वर्गाची वाट धरतो. वरील कडाळी म्हणीचें हें मूळ आहे.

– गुं. फ. आजगांवकर

वालावल (ता. कुडाळ) येथील श्रीदेव रवळनाथ ह्या दक्षिण कोंकणांतील प्रसिद्ध देवस्थानाकडे खालील गाऱ्हाणें परंपरेनें घातलें जातें.

## गाऱ्हाणें

१ बा देवा म्हाराजा समर्ता
२ आज तूं देव रवळनाथ
३ तर म्हाराजा आज तुकां सांगणां करतों आसों
४ गांव संबंधान् देसधाम् रोगराय तूं आज एशीक बांध
५ गांवार रखवाली खरी कर
६ आपली सेवाचाकरी करून घे
७ या परमाणां तूं रवळनाथ राजी जा
८ नारायेनाची समजी घाल
९ कल्याण पुरसाक् भुम्केच्या बिरामनाक्, करड्या
१० बिरामनाक्, परबपूर्वसाक्, बारांच्या धाडवसाक्
११ राज्याच्या धाडवसाक, खासा चवाटो
१२ या परमानां तूं रवळनाथ राजी जा,
१३ पावनायक् राजी कर, पावनायच्या पूर्वसाक्
१४ खनरबे भावयक्, विऱ्या बांधयाक्, आदिनारायणाक्
१५ मायेक् राजी कर, मायेच्या पूर्वसाक्, बारांच्या
१६ पूर्वसाक, रामेसरा जैनाक, कानोबा भरगिऱ्याक
१७ गिऱ्या गावड्याक् सांतेरी स्थानपुरुसाक्
१८ जैन महालक्ष्मीक्, आज घोंगड्याची तूं
१९ समजूत घाल, पूर्वेच्या गुंड्याचां गणित पुरां कर,
२० बारा पांचांचा गणित याक् कर, देसधाम दूर कर
२१ आणि सेवाचाकरी करून घेरे म्हाराजा,

# गजालीन् घोव खालो !

[ सादेव अण्णा:— पन्नाशीचे पांढरपेशे गृहस्थ. जन्माचे कामचुकार, गोष्टीवेल्हाळ; पान खाण्याच्या बाबतींत चोखंदळ. घरांत फक्त त्यांची प्रौढ मुलगी बायो वावरत आहे. सायंकाळीं साडेचारचा सुमार. सादेवअण्णा नुकतेच खालच्या आगरांतून थकून आले आहेत. पान खाण्यासाठीं नेहमीच्या जाग्यावर चंची शोधतात. चंची शोधीत असतांनाच आपल्या मुलीला बायोला हांका मारतात...... ]

**सादेवअण्णा :** बायो ऽ गो ऽ बायो ऽ आसा काय नाय ऽ ह्यां घरांत ? मी हंयसर जिव टाकुंक इलंय, आणि ह्यां गेलां ह। तरि खुंय ऽ ? ( जोरानें ) बायग्या ऽ ऽ ! ( दरवाजाजवळ बायोची आकृति दिसते ) अगो ऽ, होतस खुंय तूं ? इतको मी आराडलय ऽऽ, तर तुजी ओ सुद्धां येयना !

**बायो :** असां काय करतास अण्णा ? पाटल्या दाराक तांदूळ धुंय होतंय ! तुमची हाक आयकलंय आणि तांदूळ आदनांत टाकून ह्यां धावान इलंय !
( हात लुगड्यास पुसते ) हात सुद्धां धुलंय नाय !

**सादेवअण्णा :** ( चंची सोडतां सोडतां आश्चर्यानें ) काय ह्यां ऽ ? अगो ऽ, माज्या चंचेक् हात् कोण लावूता ? कोणी सोडलली चंची माजी ? ह्येतुर येक वस्तु जाग्यार धड नाय !!

**बायो :** इतक्यां आरडांक् काय जालां ऽ ऽ अण्णा ?.... तुमच्या चंचेक् कोण कदीं हात् लावूता ?........मगाशीं त्या फुलग्याच्या चेडवांन् हाडलीं खांवूची पानां ऽऽ तेवां कात् बगुच्यासाटीं मिच् जरा घेतूललंय ऽ ऽ !

**अण्णा :** अगो ऽ कात् घेतूलस म्हणान् काय नाय ऽ ऽ तुकां कात घेव् नको म्हण्णय नाय् मीं ऽ ऽ पण मी चंची बांद्तंय तशी ही नायऽ. माजी चंची कोणाक् दुसऱ्याक बांदांक येंवचिच् नाय ऽ ऽ आज इतूकीं वर्सां मी ही चंची सोड्तंय् आणि बांद्तंय, पण बांदण्यांत कदीं सुताचो फरक पडांचो नाय् ऽ ऽ दुसऱ्याचो हात् लागलेलो माज्या तेवांच् लक्ष्यांत येता ऽ ( रस्त्याकडे बारीक डोळ्यांनी बघीत ) अगो ऽ बायो तो ह्यच्या सारको कोण जाताहा गो तो ऽ ?

**बायो :** कोणासारको म्हणताहात अण्णा ? ( निरखून पाहिल्या-सारखें करून ) माज्या नाऽय बाये येणांहा लक्ष्यांत !

**अण्णा :** चिटूक्याचो बाबलो न्हय काय गोऽ तो ?

**बायो :** होय हो होय, अण्णा ! बाबलोच होऽ तो !! जाता हा तरी खंय असो धांवतऽ ? बघा तरी कसो धांव्ताहा ! अगदीं वाग् पाटिंक लागल्यासारको ऽ !

**अण्णा :** ( हांका मारतात ) अरे अे ऽ ऽ बाबल्या ऽ; बाबलो काय रे तो ? अरे ऽ उबो तरी रऽव ! असो धांवान् जातहस तरी खंय् ? पान खावून जा ऽऽ.

**बाबलो :** ( सादेवअण्णाच्या चोफाळ्याजवळ येत खालीं बसतो ) अन्नानु, आतां नाय गांवाचां उब्यां रवांक. ह्यां ऽ तुमी पान देतंय् म्हटलास तां घेवून धांव् मारूंक व्हयी ऽ ऽ. बैलांक सोडलहंयऽऽ वासग्यान् केलांहां मिरशांगाचां परडां. तेच्या मेरेर आसा इल्ली चाऽर. वांयच् पॉट भरतले ! पन वशाड हिरव्यां बगून भितूर घालून घेतीत म्हणान् भय दिसता ऽऽ!

**बायो :** बाबल्याचे बैल पण बैल आऽसत् हां अण्णाऽऽ कसो जपता तेंकां ऽ ! आतासां हिरव्यां नायऽतर सगळां इनाचां रान तुडौन् पालां आणतलो तेंच्यासाठींऽ बाबल्याक गोरवांची मायाच आसा हां ऽऽ !

**बाबलो :** ( खूष होऊन ) मोन् जात् हा ती बायोऽऽ तें कां सांगांक येना नाय, तें कां आदीं बगूंक व्हयां. आरतां परतां करुचां लागता. तरास जाता. . पन् तें कां पातेय् ऽ सारक्यां नाय. कोनाचां कुडान् पेंचतीत, काय करतीत. आरड घेवून येतीत ! तर काय म्हणंयऽ.... बगुंचां लागता ऽऽ

**अण्णा :** ह्यां धर पान. बस जराऽऽ, जाशीत ........ खंय नाय जाणहंत मसणांत तुजे बैल ! माजो पण आसा आज पेरो ! बाब्ड्या वाडवडलांनी तळी बांदान आपौणी पाणी हाडलां ....निसतां परतलां काय आगरां भिजान थंडगार रवतत ऽ ऽ

**बाबलो :** वाडवडलांची गजाल कित्याक बोलांक व्हयी ऽ ! केदे पुरूस तेऽ ? आनि खडपां फोडल्याहानी तीं काय अशीं तशींऽऽ·?........आतां हरन फुटली तर गुंडो लांवूक आम्कां फावना नायऽ. तेनी केल्यानी आनि आमी खातंवूऽ

**अण्णा :** सांगतंय तां काय ? .... फावणारच नाय रे अगदीं ! हरण बगून इलंऽय आणि ही चंची सोऽतहंऽय इतक्यांच तूं दिसलस्....पान खावून वांगडान जावया म्हणान हांक मारलंय. हरण बगूंक व्हयी परत. सक्यारो अडकात, पतारो अडकात, सोन्यासारक्यां पानी फुटान जायतऽ ! माज्या फाटसून आसा शिवग्या म्हापणकराचो पेरो !

**बाबलो :** शिवग्यान म्हणता कसलेशे नये कवाते ह्याडलेह्यत न्हयऽ ?

**अण्णा :** सांगा खरो बाबा कोणतरी शिवग्यान काय तरी नव्याऽ ह्याडल्याह्यान म्हणान ?....उद्योगी मास्तर ह्यां ऽ शिवगो ऽ ? अरे, पान खांवक बस म्हटलां तर बसांचो नाय ऽ. वेळ नाय घालवंचो फुकट अगदीं ! !

( पिचकारी टाकण्यासाठीं बाजूला जात )

**बाबलो :** ( माडाच्या झाडाकडे बघत ) अन्नानुं ऽ नाय ऽ !

**अण्णा :** काय म्हणस् बाबल्या ?

**बाबलो :** ह्यो ऽ माड ऽ कसो ताडासारको वाडलो ऽ नाय ?

**अण्णा :** अरे येदोसो कवातो होतो तो ! देवक्या म्हशीन् चुडतां खावन....खावन त्येची वाट लावलली....पण गेल्या चार वर्सांत एकदम् वाडलो ऽ

**बाबलो :** भाऊनीं लावूललो कवातो हो ! ....माज्या अगदीं लक्ष्यांत आसा. भाऊनीं हंयसर कुदळ मारली आनि....

**बायो :** काय तरी काय सांगतस रे बाबल्या....? भाऊ कुदळ कित्याक मारतले ? खंयूचा खंयतरी सांगतलो !

**बाबलो :** तुकां नाय ठावूक बायो ! तुजो जलम् जांवच्या आदीं खूप वर्सांची गजाल. भाऊ हंयसर इले तेवां काय होतां हंयसर ! !

**अण्णा :** मसनवट् व्हती ही !

**बाबलो :** आतां कसां ? भर बारा वाजांक् हंयसर भुतांची हुयेल आयकांक् येय ऽ....पन् भाऊनी घार बांदांच्यासाठीं हीच जागा पास केली. पायाची पयली कुदळ हंयसर मारल्यानी आनि हंयसर हो कवातो लायूल्यानी !

**अण्णा**—पण बाबल्याऽ तुकां ठावूक नाय् ऽ तो कवातो मीच हाडललंय्ऽ. मी न्हान् व्हतंय्....शाळेंत जाय्....वाटेऽर श्रीधर आनांचा घार ! खळ्यांत खूप कवाते आसांचे. तेतुयलो एक नमुन्याक दिल्यानी माकां. तो हो कवातो ! !

**बाबलो :** सांगतास् तरी काय अन्नानु ? शीरीदर आना कोन ? नाय बा लक्ष्यांत येना !

**अण्णा :** अरे श्रीधर आना तुकां ठावूक नाय ऽ बाबल्या ! अरे ते वेळेवरचे श्रीधर आना ! !

**बाबलो :** येळेवरचे अना ऽ ऽ ? असा सांगा ऽ माडयेचा घार आसा ते ! माकां काय ठावक नाय ? पन् अन्नानुं त्यांचा तुमचा काय इतक्या ह्यां ऽऽ?

**अण्णा :** अरे मी न्हान् आसल्यापासून माजार तेंचो भारी लोभ ! ह्यां ऽ झाकीटच बगीनऽस ! तेणीच दिलां माकां भ्याट म्हणान् !

**बायो :** काय तरी काय सांगतास अण्णा ? बाबल्या तूंच बग रे ! आनांनी दिल्ला झॅकीट आजून रवलाह्यां ऽ ? तेकां केवांच वाळवी लागली. मगे गुदस्तां मी ह्यां नव्या झॅकीट शिवलंय अण्णासाठीं. अण्णांच्या--काय लक्षांतच रऽवणा ऽऽ नाय ऽऽ !

**अण्णा :** आसात्....आसात् गो ! माज्या तरी आतां खंय रवताह्या लक्ष्यांत ?

**बाबलो**—अन्नानु ! ह्या पड्येच्या भितोडेची पोपय पडलीऽ का काय ?

**बायो :** ती एक मोटी गमतच आसा बग बाबल्या. अण्णा सांगतीत तुकां ती गजाल !

**बाबलो :** काय पन सुरेक पोपय जाल्ली ! जालां तरी काय तिका मोडान पडांक ? वारो नाय वादाळ नाय. येक येक पोपय अशीऽ येऽदी....गोडयेक पन बरी व्हती नाय बायो ?

**बायो :** न्हाणयेच्या पाणयाचो खात आणि चुलींतली एका तेंकां गावली. तेच्यार ती मातली. शाशंबर पोपय होत्यो वरते. भारान अगदीं मोडांक इली. पण काइंक चडता कोण वरतो?

**अण्णा :** धा, बारा, पंदरा हाताच्या फुडे वाडलऽलीऽरे, माणग्या-सारकी.पडवेच्या नळ्यांत शिराकली. बायो तर थारच करीना. कोणायकय वरतो चडवा म्हणान. पण गावता कोण चडांक ? मगेऽतो ह्येचो हो ऽ मोठ्या ह्येणां तेच्यार चडलो ! !

**बाबलो :** चडलो तरी कोन म्हनतास वरतो ? मोटो काळजाचोच् आसाक व्हयो ! !

**बायो :** तां काय इचारूं नको बाबल्या ऽ. हुंदरा सारको न्हयरें वरतो चडलो ऽऽ तो. वरतो चडांक लागलो मातर आणि अण्णांनी जो काय आकांत केलो हाऽ तो काय इचारूं नको ! ! ऽ

**बाबलो :** सांगतस तरी काय बायो ?ऽऽ त्याच येळार अन्नांक काय चावलां, असो आकांत करूंक ?

**अण्णा :** तेचां काय आयकतस बाबल्या ! अरे चावांक कित्याक व्हयां ? पोर तो केदो !....तो वरतो चडांक् लागलो ऽ आणि माझ्या काळजाचां पाणी जालां ऽ ऽ. पोपय रवतीत् एका बाजूक आणि पंचनामो करूंची पाळी येयत माज्यार !

**बायो :** मी पण भियालंय हांऽ मनांत बाबल्या....आणि अण्णा इतक्या करतहत तर तूं खालीं उतार म्हणान म्हणांक लागलंयऽ शिरां पडो येवन त्या पोपयांर रे तूं खालीं उतार !

**बाबलो :** मगे उतारलो मा एकदां खालीं ? बरा जालां बाये ! ऽऽ पडान मरांचो लोकांचो पोर ! !

**अण्णा :** आयकतस काय बाबल्या अरे खालीं उतरांच्या नावान रामा, शिवा, गोविंदा ! आणि तो वरतोच जांवक लागलो....

**बायो :** आणि काय सांगा तुकां बाबल्या ऽऽ तो कवाळ्यांत न्हयरे गेलो ! !

**बाबलो :** कवाळ्यांत गेलो ?

**बायो :** तो कवाळ्यांत गेलो आणि अण्णांक हकडे झीट् इली.

**अण्णा :** मी म्हणंय, जळानेत त्यो पोपय ऽऽ तूं खालीं उतार !

**बायो :** तां याक नाटकच जालां बग् बाबल्या ऽऽ

**बाबलो :** नाटक कसलां तेतुर बायो ?

**बायो :** नाटक नाय तर काय रे, बाबल्या ? तो कवाळ्यांत बसान येक येक पोपय काडताहा आणि अण्णा हकडे आरडान जीव घालवतहत ऽऽ ! तो काय खालीं उतरयना आणि अण्णांची आरड काय थांबयना !

**बाबलो :** मगे उतारलो. तरी केवां तो ?

**बायो :** जेवां त्या भाद्दरान शंबर पोपय मोजून काड्ले ऽ तेंव्हां तो खालीं उतारलो ! !

**अण्णा :** पुन्ना परत त्या पोपयर कोणायकय चडौन अपशराण नको म्हणान त्याच पोराकड्सन तो हणान घेतलंय !

**बाबलो :** अन्नानुं ह्यां पोपयचां रामायन जालां पन रामाची शीता कोन तां रवलांच ! कोनाचो बा पोर तो इतको काळजाचो ?

**अण्णा :** अरे तो सड्यावयल्या फोंडेकराचो दत्तो ! वांदरा सारको चड्ता झाडार !

**बाबलो :** मुकत्याचो दत्तो ऽ.... असां ऽ सांगा ! आतां इलां लक्ष्यांत आसा खरो पोर मोटो चलाक ! पन अन्नानु; तेकां ह्यां वांयच कमीच हां ऽ ऽ

**बायो :** बाबल्या, दत्त्याची दुसरीच मोटी गमतीची गजाल आसाऽ अण्णा सांगतीत तुकां.हंसान हंसान अगदीं मुडदो पडतां ऽ ऽ

**बाबलो :** ( बैलांची एकदम आठवण येऊन ) आतां गजाल खांदेत बायो. बैल थकडे वासग्याचां कुडान पेंचतीत आनि मगे कोन बाबडो म्हनतां तो तेतुरलां जाऽयत. वा ऽ ऽ न्हय गजालीन घोव खाल्लो तेतुरलां जायत ऽ ऽ

**अण्णा :** माकां पण जांवचां आसा पाणी बगूक. ही चंची बांदतंय् आणि वांगडानच जावयाऽऽ ( घराखालीं आगरांत ओरड ऐकूं येते. अन्नानु ओऽऽ ओऽऽ अन्नांनु ! फुटान गेला ओऽऽ अन्नानुं पानीऽऽ ) अरे, आरडता कोण थकडे आगरांत ?

**बायो :** शिवगो सो दिसताऽऽ पाणयाचां काय म्हणताहा ! हरण फुटली का काय ?

**अण्णा :** ( उठत ) गजालिन घोव खाल्लो सो दिसता !

**शिवा :** ( धांपा टाकीत, जवळ येत ) अन्नानुं, अन्नानु, सत्त्यानास जालो ! !

**बायो :** अरे जालां तरी काय शिवा ?

**शिवा :** अगोऽ बांद फुटलो केसग्याच्या मांगरावरतोऽ सक्यारो अडकान हरन तुंबली आनि बांद फुटलो केसग्याच्या वांकनार !

**बाबलो :** ( काळजीनें ) माजे बैल नाय मां गमाक शिवा ?

**शिवा :** बाबल्याऽ ऽ अरे तूं हंयसर काय रे ? मेल्याऽ ऽ तुझ्या बैलांनी सत्त्यानास केलो वासग्याच्या मिरशांगांचो ! !

**बाबल्या :** शिवग्या ऽ मिरशांगांत बैल नगलस तर तें कां भायर काडूंचो सांडून हकडे आरडत इलसा तां काय ?

**शिवा :** अरे, अन्नांचा पानी खंयसरसां इलां तां बगुंचा म्हणान त्या नाजूक येय व्हतंय, तर वासग्याच्या परड्यांत तुजे वोसू चरतऽहत ! ! हांबडूंक गेलंय ऽ तर धांवले न्हय रे चंडाळ माज्या अंगार ! !

**बाबलो :** ( धांवतो ) फटकी रे येंव त्या बैलांर! वासगो आतां माकां ठेंवचो नाय ऽऽ गजालिन शापच घोव खालो माजो होऽऽ ! ( जातो. )

**अण्णा :** खंयसर म्हटलस फुटलो शिवा बांद ?........ केसग्याच्या वांकनार ?

**शिवा :** थंयसरच फुटलो ओ अन्ना, आनि पानी गेलां सगळां केसग्याच्या मांगरांत !

**अण्णा :** ( निःश्वास सोडून ) मांगरांत काय होता नाय म्हणान बरांऽ !

**शिवा :** नाय ओ काय अन्नाऽऽ सरवाळ्यांत तरवो उपांच्या सार्टी बियांचां भात हाऽडल्यान केसग्यान आजच बाजार सून. मांगरांत ठेयलालां तितकयलां भात भिजान सत्यानास जालो ! !

**अण्णा :** अरे ऽऽ देवा ! केसग्याक तोंड कसां दाखंव आतां ?

**बायो :** बगलस मां शिवा ऽऽ अण्णांच्या मनाक· भारीच लागलां ऽऽ कदीं म्हणान गजालकि अशे बसणत नायऽऽ चंची सोडल्यानी आाणि हेऽ चोफाळ्यार बसले. इकतुकच कदीं न्हय तो चिटक्याचो बाबलो दिसलोऽऽ.... पान खावन जा म्हणान हांक मारल्यानीऽऽ ह्यां पान तोंडांत टाकतहत तर तुजी आरड आगरांत ! !

**शिवा :** अन्नांचां काय माकां सांगांक न्हयांऽऽ बायोऽऽ ! पन गजालीचां ह्यां असांच जातांऽऽ वासगो मिरशांगांक नागावलो आनि केसगो तरव्याक !

**बायो :** ( आठवून ) अगे बाये ! अगदींच कसां इसारलंय बगा ! आदनांत तांदूळ घातललंय !

**अण्णा** : अगो असा बगींत काय रवलस तोंड उगडून ! जा बेगिना बग जा ! करपान कोळसो जालो आसात भाताचो ! आतां भायर तोंड दाखौंक नको आणि सांचो भात तोंडांत घालुंक नको शिवा !

**शिवा** : अन्नांनु, आतां बायोर कित्याक कावतांस ? गजालिन सगळ्यांचोच घोव खाल्लो !

**अण्णा** : गजालीन घोव खाल्लो खरो ! !

**समाप्त**

# चेडवाक निरोप

चड–चेड्वा पडवांत्सुन आगबोटीर जपान ।। धृ० ।।

शिमिटाच्या चाळींत घो तुजो न्हवता
हडपलो दिसभर खपान्
गिर्नितली चाकरी हटेलांतला खानां
उरतालां कसलां घोपान् ?
मेळयता आडको, सायबाचो लाडको
संबाळुंक बायलच गुपान्
मायेचां मानुस, होयां घालुंकसवरुंक
नायतर तो जायत गो सुकान्
आखरेकुन धर त्याकां, तिनसांजच्या येळाक्
दारयेचां बगीत दुकान्
बरी तर बरी; म्हुमयची चाकरी;
घालयतत् किती गो फुकान्
डोळचांत्सुन पानयां, नको काडुं चेडवा
पोटांत्सुन येता हुडकान्,
आटा आटा दिशीं, खुशालेचा कारिट्,
सांग घोवाक घालुंक लिकान्
बोट फुडे सरता तुयां फाटिं बगतस्
भरुं नको डोळे दुखान्

कै. वि. कृ. नेरूरकर

## कुडाळदेशकर गौडब्राह्मण को-ऑपरेटिव्ह क्रे. सोसायटी लिमिटेड, मुंबई नं. ४.

१ मुंबईंत राहाणाऱ्या कोणाही ज्ञातीय स्त्री–पुरुषाला सभासद होतां येतें.

२ आकर्षक दरांत चालू व मुदतीच्या ठेवी ठेवतां येतात.

## सोसायटीचें धान्य दुकान

उत्तम दर्जाचा माल माफक दरांत घरपोंच केला जातो.

अधिक माहितीसाठीं समक्ष भेटावें.

पत्ताः–
२८, कुडाळदेशकर निवास,
मुंबई नं. ४.

आ. नम्र
महादेव अनंत प्रभु
ऑनररी सेक्रेटरी

# नित्यानंद टी एजन्सी

सुवासिक चहा मिळण्याचें खात्रीचें ठिकाण

## धाऊक व किरकोळ चहाचे व्यापारी
## गव्हर्न्मेंट, मील, कॅन्टीन टी सप्लायर्स

१२ के. डी. बी. निवास,
गिरगांव मुंबई नं. ४.

सर्व प्रकारच्या ग्लास फॅक्टरी व फाऊंड्री
मटेरिअलकरितां खात्रीचें ठिकाण

— लिहा अगर भेटा —

★

# आर. एच. सामंत
# आणि कंपनी

(माईन ओनर्स आणि मिनरल मर्चंट)

★

**घरचा पता :**
*१७ के, कोळीवाडी*
*फणसवाडी मुंबई नं. २*
*टेलीफोन : ३९६४०*

**ऑफीस :**
*ब्रिक बंदर*
*हे बंदर रोड मुंबई नं. १५*
*टेलिफोन : ७३७७९*

# खानोली गांवांतील एक थोर सत्पुरुष

# श्रीमद्दत्तगिरी महाराज यांचें प्रासादिक चरित्र

किंमत २ रु.

ले.:–प्रो. दि. ग. नाईक

ह्या चरित्रपर पुस्तकाबद्दल गोपुरीचे **पू. अप्पा पटवर्धन** म्हणतात:—

" श्री. गोविंदराव शिंदे यांचेमार्फत मला आपलें श्रीमद्दत्तगिरी गोसावींचें चरित्र मिळालें. मी तें संपूर्ण वाचलें. आपली भाषा-शैलीच इतकी चटकदार आहे आणि आपल्या परिचित स्थळांचा उल्लेख इतका चित्ताकर्षक होतो कीं, पुस्तक पुरें वाचल्याखेरीज खालीं ठेवतां येत नाहीं. दत्तगिरींच्या चमत्कारांपेक्षां त्यांच्या उदात्त शिकवणीला अधिक महत्व देण्याचा आपण केलेला प्रयत्न स्तुत्य आहे.

" चिरपरिचयांतील लोकोत्तर विभूतींचें महत्व लोकांना समजाऊन देण्याचें काम अशीं पुस्तकें करतात. "

पुस्तकें खालील ठिकाणीं मिळतील.

(१) खानोली ग्रामोत्कर्ष समाज
२५ कु. दे. ब्राह्मणानिवास मुं. ४

(२) नाईक आणि कंपनी
शाहूपुरी, कोल्हापूर.

(३) डॉ. राधाकृष्ण र. प्रभु
वेंगुर्ला, जि. रत्नागिरी

(४) श्रीरंग मळीक मर्चंट,
वेंगुर्ला.